महाराष्ट्र टाईम्स, नागपुर, शुक्रवार 1 आक्टोबर 2026

Page - 4/16

# कृषि विज्ञान केंद्र

(डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला)

सोनापूर, गडचिरोली-४४२ ६०५ (महाराष्ट्र)

## जनावरांचा जाहीर लिलाव

## वर्ष २०२६-२७

जा. क्र/व.शा.प्र./कृविके/गड/ ७८६ /२०२६ दि. २९/०९/२०२६

कृषि विज्ञान केंद्र, सोनापूर-गडचिरोली येथील पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभागातील पशुधनाची उदा. गायी /गोऱ्हे इ. जनावरांची विक्री जाहीर लिलावाने रोज सोमवार दि. १२/१०/२०२६ रोजी सकाळी १० वाजता कृषि विज्ञान केंद्र, सोनापूर-गडचिरोली येथे करण्यात येईल. या लिलावात गायी /गोऱ्हे एकूण ३० लहान-मोठ्या जनावरांचा जाहीर लिलाव करण्यात येईल. लिलावाच्या नियम व अटी व अन्य माहिती दि. ०५/१०/२०२६ पासून विद्यापीठ संकेतस्थळ www.pdkv.ac.in वर उपलब्ध राहील तसेच या कार्यालयात कार्यालयीन कामाच्या वेळेत पाहावयास मिळतील.

लिलाव त्या दिवशी पुर्ण न झाल्यास दुसऱ्या दिवशी त्याच वेळेस, त्याच ठिकाणी पुन्हा सुरु होईल. तरी इच्छुकांनी लिलावात सहभाग घ्यावा.

लिलावाचे स्थळ :
कृषि विज्ञान केंद्र, आय.टी.आय. चौक, मुल रोड,
सोनापूर-गडचिरोली ता. जि. गडचिरोली

वरिष्ठ शास्त्रज्ञ आणि प्रमुख
कृषि विज्ञान केंद्र, गडचिरोली

Scanned with OKEN Scanner

**डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला**
## कृषि विज्ञान केंद्र, सोनापूर-गडचिरोली

### लिलावाच्या अटी व नियम

**दिनांक १२/१०/२०२६ रोजी रोज सोमवारला** सकाळी १०.०० वाजता कृषि विज्ञान केंद्र, सोनापूर-गडचिरोली येथे जाहीर लिलाव करण्यात येणार आहे.

जनावरांच्या लिलावाकरीता नियुक्त अधिकारी जनावरांचा लिलाव करतील लिलाव सुरू करण्यापुर्वी जनावराची पुर्ण माहिती जाहीर करतील व लिलावाच्या अटी समजावून सांगतील.

१) लिलावात बोली बोलण्यास सुरवातीला रू. १०००/- (रू. एक हजार फक्त) अनामत रक्कम म्हणुन जमा करावी लागेल. कोणत्याही व्यक्तीस अनामत रक्कम भरल्याशिवाय लिलावामध्ये बोली बोलण्यास परवानगी देण्यात येणार नाही. एखादे व्यक्तीच्या नावे बोली पुर्ण झाल्यास व त्याने जनावर /जनावरे घेण्यास नकार दिल्यास सदर अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. गुरांचा लिलाव शेतकऱ्यांच्या हितार्थ असल्याने शेतकऱ्यांचा शेतजमिनीचा ७/१२ दाखला सोबत आनणे आवश्यक राहील.

२) लिलावात जनावर/जनावरे घेण्याची अनामत रक्कम त्या सर्वोच्च बोली धारकाने जनावर/ जनावरे त्यांची संपुर्ण रक्कम भरल्यानंतरच परत करण्यात येईल. त्याचप्रमाणे अयशस्वी बोली बोलणाऱ्यांची अनामत रक्कम लिलाव संपल्यानंतर परत करण्यात येईल.

३) बोली बोलतांना बोलीची रक्कम कमीत कमी रू. २००/- रूपयांनी वाढवावी लागेल. लिलावाची तिसरी फेरी पुर्ण झाल्यावर सर्वात जास्त बोली बोलणाऱ्याचे नाव जाहीर करून लिलावाची प्रक्रिया पुर्ण करण्यात येईल.

४)ज्या व्यक्तीची बोली मंजुर झाली त्या व्यक्तीला मंजुर झालेल्या बोलीच्या किंमती एवढी पुर्ण रक्कम त्वरित अदा करावी लागेल. लिलावात खरेदी केलेल्या जनावरांची पुर्ण किंमत भरुन संबंधीत बोली धारकांना सदर जनावर/जनावरे ताबडतोब स्वत:च्या ताब्यात घ्यावी लागेल व स्वखर्चाने न्यावे लागेल. सदर जनावरांची कोणतीही जवाबदारी विभागाची / लिलाव समितीची राहणार नाही. त्याची सर्वस्वी जवाबदारी मंजुर बोलीधारकाची राहील. बोली धारकाने खरेदी केलेले जनावरे ताबडतोब ताब्यात न घेतल्यास त्याची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल व संबंधीत जनावरांचा समिती मार्फत पुन्हा लिलाव करण्यात येईल.

५) लिलावातील जास्तीत जास्त बोली स्वीकृत करणे अथवा न करणे तसेच अपेक्षेपेक्षा बोली कमी असल्यास संबंधीत जनावरे देण्याचा अथवा न देण्याचा सर्व अधिकार लिलाव समितीचा राहील. ह्याशिवाय लिलावात इतर बाबतीत लिलाव समिती अधिकाऱ्यांचा निर्णय अखेरचा व बंधनकारक राहील.

६) एकदा लिलावात विकत घेतलेले जनावर कोणत्याही सबबी दाखल परत घेतल्या जाणार नाही. संबंधीत बोली धारकाने जनावरांचा ताबा न घेतल्यास अनामत रक्कम जप्त करुण विद्यापीठात जमा करण्यात येईल.

७) जनावरांचा लिलाव प्रत्येकाच्या बाबतीत वेगवेगळा अथवा गटागटाने करणे हे लिलाव समितीच्या मर्जीवर अवलंबुन राहील.

८) लिलाव पुर्ण करण्याचा निर्णय तसेच कोणतेही कारण न दाखवता लिलाव रद्द/ स्थगीत करण्याचा अधिकार लिलाव समिती अधिकाऱ्यास राहील तसेच लिलावाव्दारे विकण्यात येणाऱ्या जनावरांची संख्या कमी अथवा जास्त करण्याचे अधिकार लिलाव समितीस राहील. लिलाव समितीने दिलेल्या निर्णयावर कोणतीही अपील करता येणार नाही. बोली धारकांना हा निर्णय अखेरचा व बंधनकारक राहील.

९) लिलाव समितीच्या कामकाजामध्ये अडथळा आणने, आरडाओरड करणे किंवा दखल देणाऱ्यास लिलावातून बाद करण्यात येईल. आणि त्याची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

१०) लिलावात सर्वोच्च बोली बोलून जनावर/जनावरे खरेदी केलेल्या बोली धारकास सदरहु जनावरे ताब्यात घेतांना ती जनावरे शेतीकामाकरीता /पाळण्याकरीता विकत घेत असून कत्तलीसाठी वापरणार नाही असे लेखी हमीपत्र लिहून द्यावे लागेल.

११) लिलावात विकत घेतलेले जनावर /जनावरे बोली धारकाने २४.०० तासांच्या आत न नेल्यास रू. २००/- खावटी म्हणून विभागात जमा करावी लागेल अन्यथा सदरहु बोली धारकाची रक्कम जप्त करण्यात येईल.

१२) नाव नोंदणी व अनामत रक्कम भरण्याची वेळ सकाळी १०.०० ते ११.०० वाजेपर्यंत राहील.

१३) लिलावाचे स्थळ : कृषि विज्ञान केंद्र, सोनापूर-गडचिरोली

वरिष्ठ शास्त्रज्ञ आणि प्रमुख
कृषि विज्ञान केंद्र, सोनापूर-गडचिरोली

Scanned with OKEN Scanner